# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २/०५/२०२३ चे ठराव

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२०** **विषय क्रमांक –३२०**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२०**<br>**दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४७७/२०२३ दि.२५/०४/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक २०२३-२४ मध्ये प्रशासकीय मान्यता रक्कम व नावात बदल करून मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२०**<br>**दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४७७/२०२३ दि.२५/०४/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील प्रभाग क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील आ.क्र.१/८८ (अ) येथे ८५० बेडचे हॉस्पिटल विकसित करणे या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५९४ दि.२०/१/२०२१ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तथापि सदरचे क्षेत्र मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र.पमफ/१/कावि/९३५/२००६ दि.८/११/२००६ अन्वये Identical Forest वनक्षेत्र म्हणुन मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे यांना कळविले आहे. त्यामुळे प्रभाग क्र.१ चिखली गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील जागा मनपास मिळणे शक्य नाही. मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील क्र.पमह/सिआर/०५/२०२२ दि.२८/०९/२०२२ रोजीच्या सुधारित आदेशानुसार मोशी गट नं.६४६ (पै) मधील आ.क्र.१/१८९ मधील ६ हेक्टर जागा मनपा उपयोग (हॉस्पिटल) या प्रयोजनाकरीता मनपाचे ताब्यात आलेली आहे.<br><br>त्यामुळे प्रभाग क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील आ.क्र.१/८८ (अ) येथे हॉस्पिटल विकसित करणे या मनपाच्या सन २०२२-२३ मुळ अंदाजपत्रकातील पान क्र.४२ अ.क्र.७२ च्या ऐवजी मोशी येथील गट क्र.६४६ मधील गायरान जागेमध्ये हॉस्पिटल बांधणे, सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकातील पान क्र.७२ अ.क्र.६२ प्रमाणे नावात बदल करून हॉस्पिटल विकसित करणेच्या कामासाठी असलेल्या र.रू.२१४,७४,८३,६४७/- या मुळ प्रशासकीय मान्यतेमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता एकुण र.रू.४५०,००,००,०००/- इतकी असा बदल करणेकामी प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.२५१ दि.१०/१/२०२३ अन्वये मिळालेली आहे.<br><br>तसेच बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक थेरगांव या MDR-31 रस्त्याचे फुटपाथ अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे या कामाकरीता मनपाच्या सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकामध्ये (पान क्र,४१ व अ.क्र.३५) समावेश असुन र.रू.१० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता आहे. तथापि बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक थेरगांव या MDR-31 रस्त्याचे फुटपाथ |

| | |
|---|---|
| | अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसीत करणे या कामाकरीता सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकातील पान क्र.७१, अ.क्र.३८ सदरची प्रशासकीय मान्यता काम पुर्ण करण्यासाठी र.रु. १० कोटी अपुरी असुन त्यात वाढ करून र.रू.२५ कोटी इतकी प्रशासकीय मान्यता मा.महापालिका सभा ठराव क्र.२१४ दि.६/१२/२०२२ अन्वये मिळालेली आहे.<br><br>तथापि सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये सदरच्या मंजुर ठरावाची नोंद झाली नाही. त्यामुळे ऑनलाईन अंदाजपत्रकात मंजूर ठरावाप्रमाणे बदल करण्याकरिता मान्यता आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२१** **विषय क्रमांक –३२१**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२१<br>दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/८/कावि/११०/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयात सीटी स्कॅन सुविधा सुरु करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२१<br>दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/८/कावि/११०/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयामध्ये सीटी स्कॅनची सेवा सुरु करणेकामी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी आयुक्त सो.यांचे दालनात झालेल्या बैठकिमध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. सदर बैठकितील निर्णयानुसार मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस् प्रा.लि यांना कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील 64 slice CT Scan मशीनची सुविधा उभारणी व देखभाल दुरुस्तीसह सीटी स्कॅन सेंटर चालविण्यास देणेकामी मान्यता दिलेली आहे. कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये यापुर्वी ज्या दराने सदर सीटी स्कॅन सुविधेकरिता निविदा स्विकृत केली होती. त्याच दराने व त्याच करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार नवीन थेरगाव रुग्णालयातील सीटी स्कॅन सेंटरची सुविधा चालविण्या कामी मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस् प्रा.लि यांना दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या सभावृत्तांतनुसार व मा.आयुक्त सो यांचेकडील दिनांक २४/४/२०२३ रोजीच्या प्रस्तावान्वये ५ वर्षे कालावधी करिता कार्यान्वीत करणेकामी मान्यता देण्यात आलेली आहे.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागामध्ये सीटीस्कॅन सेंटरकरीता राखून ठेवण्यात आलेल्या नियोजित जागेमध्ये 64 slice CT Scan मशीनची उभारणी व देखभाल दुरुस्ती करिता मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस् प्रा.लि यांना नगररचना व विकास विभाग व भुमी जिंदगी विभाग यांनी ठरवुन दिलेल्या दरानुसार सन २०२३-२४ मुल्य दर तक्त्यानुसार मासिक भाडे दर र.रु ४७.२० प्रति.चौ.फुट (मनपा कराव्यातिरिक्त) व पुढील प्रत्येक वर्षी १२.५% भाडेवाढ प्रमाणे नियोजित जागेची |

| | |
|---|---|
| | आकारणी करुन ५ वर्षे कालावधी करिता यापुर्वीच्या दराने व त्याच करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार नवीन थेरगाव रुग्णालयातील सीटी स्कॅन सेंटरची सुविधा उभारणी व देखभाल दुरुस्तीसह सीटी स्कॅन सेंटर सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि नवीन थेरगाव रुग्णालयामध्ये सीटी स्कॅन सेंटर नव्याने सुरु करण्यात येत असल्याने सदरची बाब धोरणात्मक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२२** **विषय क्रमांक –३२२**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२२<br>दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/९/कावि/२००/२०२३ दि.२५ एप्रिल २०२३ अन्वये, डॉ.अय्यर राजशेखर रामनाथ,वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांचे अनुज्ञेय निवृती वेतनातुन १०% भाग पुढील ५ वर्षाकरिता रोखुन ठेवणेस मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२२<br>दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/९/कावि/२००/२०२३ दि.२५ एप्रिल २०२३ अन्वये, यशवंतराव स्मृती रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या Multiplace HBOT मशीन खरेदी प्रकरणी डॉ.अय्यर यांनी मल्टीप्लेक्स एच.बी.ओ.टी मशिन खरेदी करणे संदर्भात निविदा प्रक्रियेस स्वतः अधिकारात मान्यता दिली,मशिन खरेदी करणेपुर्वी राष्ट्रीय तथा राज्य पातळीवर खप असलेल्या वर्तमानपत्रात निविदा जाहीर करणे आवश्यक असतांनाही तशी कार्यवाही केलेली नाही.त्यामुळे सदर अनियमिततेस डॉ.अय्यर राजशेखर रामनाथ,वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) हे जबाबदार असल्याने त्यांची दि.०८/०९/२०१५ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी सुरु करण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले होते. प्रकरणी डॉ.अय्यर यांचे विरुध्द चौकशी होवुन चौकशीचा अहवाल चौकशी अधिकारी डॉ.एस.बी.पानसे यांनी दि-२६/०५/२०१७ रोजी मा.आयुक्त सो.यांना सादर केलेला आहे. त्यामध्ये डॉ.अय्यर यांचेवर ठेवणेत आलेल्या एकुण ५ दोषारोपापैकी **मल्टीप्लेस एच.बी.ओ.टी मशिन/सिस्टिम खरेदीस मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.त्यानुसार खरेदीची प्रक्रिया राबविणेत आलेली आहे.त्यामुळे डॉ.अय्यर वरील अ.क्र १ व २ हे दोन दोषारोप शाबीत झालेले नाही**.तथापी अ.**क्र ३ ते ५ मधील निकोप स्पर्धा,जास्त खप असलेल्या वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द न करणे व सेवानिवृतीच्या शेवटच्या दिवशी खरेदीचा आदेश देणे हे तीनही दोषारोप डॉ.अय्यर यांचे विरुध्द शाबीत झाल्याचा** अंतिम निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदविलेले आहे. डॉ.अय्यर राजशेखर रामनाथ,वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांनी त्यांचे चौकशी अहवालावरील अभिवेदन सादर केलेले आहे.त्यामध्ये शासनस्तर व मनपा स्तरावर उल्लेखनीय कामाबाबत वेळोवेळी दखल घेवुन प्रशस्तीपत्रके दिलेली आहे.त्यामुळे अभिवेदनातील बाबीचा विचार करुन दोषमुक्त करणेची |

| | |
|---|---|
| | विनंती केलेली आहे.प्रकरणी विभागप्रमुख,आरोग्य वैद्यकिय अधिकारी,वैद्यकिय मुख्य कार्यालय यांनी दि-१४/०७/२०१७ च्या पत्रान्वये डॉ.अय्यर **यांचेवरील सिध्द झालेले दोषारोप विचारात घेवुन योग्य ती शास्ती कारवाई करणेबाबत शिफ़ारस केलेली आहे**.प्रकरणी **डॉ.अय्यर यांनी कर्तव्याप्रती नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता न ठेवता कर्तव्यात कसुर करुन** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१)(एक)(दोन)(तीन) मधील तरतुदीचा भंग केल्याने त्यांचेविरुध्द शास्ती कारवाई करणे आवश्यक आहे. ज्याअर्थी, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७(१) नुसार एखादा अधिकारी/कर्मचारी हा त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभीर गैरवर्तणुकीबदल अपराधी असल्याचे विभागीय/न्यायिक चौकशीत आढळ झाल्यास शासन आदेशाद्वारे निवृतीवेतन किंवा त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखुन ठेवता येईल अशी तरतुद आहे.यास्तव उक्त नियमानुसार **डॉ.अय्यर राजशेखर रामनाथ वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांचेविरुध्द शाबीत झालेल्या दोषारोपानुसार त्यांचेअनुज्ञेय निवृती वेतनातील १०% भाग पुढील ५ वर्षाकरिता कायमस्वरुपी रोखुन ठेवणेची शास्ती कारवाई करणे आवश्यक आहे.**<br><br>सबब,**डॉ.अय्यर राजशेखर रामनाथ वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांचे विरुध्द उपरोक्त नमुदशास्ती कारवाई करणेकरिता** मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२३** **विषय क्रमांक –३२३**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२३**<br>**दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र जा. क्र. जनि/कावि/१३९/२०२३ दि.२५/०४/२०२३ अन्वये, सन २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्पातील “अमृत योजना अंतर्गत प्रोत्साहन पर अनुदान” या लेखाशिर्षा अंतर्गत कामाचा समावेश करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२३**<br>**दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र जा. क्र. जनि/कावि/१३९/२०२३ दि.२५/०४/२०२३ अन्वये, अमृत अभियानांतर्गत सुधारणांची (Reforms) पूर्तता केलेबद्दल प्राप्त झालेल्या प्रोत्साहन अनुदानाचा वापर विहित केलेली मार्गदर्शक सुचना “पिंपरी चिंचवड शहरात स्वच्छ भारत अभियानांतर्गत अंतर्भूत घटकांसाठी” करणेबाबत मान्यता मा. आयुक्त यांनी दि. १४/०६/२०२२ चे आदेशान्वये दिलेली आहे. सदरच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या “**पिंपरी चिंचवड शहराच्या सुशोभिकरणासाठी रस्त्यावरील CD Work च्या Upstream बाजुस व Downstream बाजुस Chain Link Fencing करणे**” या कामाकरिता मा. प्रशासक ठराव- |

<table>
<tr><td></td><td>७९, दि. ७/६/२०२२ अन्वये र. रु. ४२,६७,५००/- करिता मा. महापालिका सभेची मान्यता मिळाली आहे. सदर कामाची निविदा कार्यवाही पूर्ण झाली असून मा. स्थायी समिती ठराव क्र. ९६३, दि. ०६/१२/२०२२ अन्वये -३५.७७% दराने र. रु. २२,८४,९९२/- पर्यंत काम करून घेणेस नमुद कामास मान्यता देणेत आलेली आहे. विषयांकीत कामाचा कार्यादेश दि. ०४/०१/२०२३ रोजी देणेत आलेला असून त्यानुषंगाने काम सुरु आहे. सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये “अमृत योजना अंतर्गत प्रोत्साहन पर अनुदान” या लेखाशिर्षा अंतर्गत सदरचे काम काढणेत आले आहे तथापि, सदरचे लेखाशिर्षाअंतर्गत कामाच्या नावाचा समावेश अंदाजपत्रकात नसल्याने काम होऊनही कामाचे देयक अदा करता येत नाहीत. त्यामुळे सदर लेखाशिर्षांतर्गत कामाची देयके अदा करणेकामी विषयांकित कामाचा सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणे आवश्यक असल्याने तक्त्यामध्ये नमुद केलेल्या कामाचा समावेश करणेकरीता मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br><br><table><tr><th>अ.क्र.</th><th>लेखाशिर्ष</th><th>कामाचे नाव</th><th>अंदाजपत्रकीय रक्कम</th></tr><tr><td>१</td><td>अमृत योजना अंतर्गत प्रोत्साहन पर अनुदान</td><td>पिंपरी चिंचवड शहराच्या सुशोभिकरणासाठी रस्त्यावरील CD Work च्या Upstream बाजुस व Downstream बाजुस Chain Link Fencing करणे.</td><td>र.रु. ४२,६७,५००/-</td></tr></table></td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२४** **विषय क्रमांक –३२४**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२४ दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१४६/२०२३ दि. २९/०४/२०२३ दि.२९/४/२०२३ अन्वये, प्रभाग क्र.२४, आनंदवननगर, गणेशनगर मैदान, थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा आद्यम योग संस्था,वडगाव शेरी, पुणे या संस्थेस, योग व योग थेरपीसाठी ५ वर्षे कराराने चालविण्यास देणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२४ दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१४६/२०२३ दि. २९/०४/२०२३ दि.२९/४/२०२३ अन्वये, म.न.पा.चा प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८ ,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर, गणेशनगर, संचेती शाळेजवळ,थेरगाव डांगे चौक रोड,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा, आद्यम योग संस्था वडगाव शेरी पुणे ४११०१४ या संस्थेस योग व योग थेरपीसाठी संस्थेस करारांचे चालविण्यास दिल्यास, योग थेरपीसाठी येणा-या एकूण नागरिकांच्या संख्येच्या ६० % नागरिकांकडून आद्यम योग संस्था, यांनी स्वतः ठरवलेले |

| | |
|---|---|
| | शुल्क त्यांचेकडून आकारून त्यांना योग थेरपी देणेस व योग थेरपीसाठी येणा-या एकूण नागरिकांच्या संख्येच्या ४० % म.न.पा अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्र पाहून विनामुल्य योग व योग थेरपी ही सुविधा देणेस बंधकारक राहील. या अटीवर व म.न.पा.चे अटी व शर्तीनुसार, आद्यम योग संस्था वडगाव शेरी पुणे ४११०१४ या संस्थेस, प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर, गणेशनगर,संचेती शाळेजवळ थेरगाव डांगे चौक रोड,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा योग व योग थेरपीसाठी ५ वर्षे कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे .<br>डॉ.शंकर खेडकर,अध्यक्ष,आद्यम योग संस्था, वडगाव शेरी ,पुणे ४११०१४ यांनी आद्यम योग संस्था, ही धर्मादाय आयुक्त नोंदणीकृत संस्था असून पुणे महानगरपालिका क्षेत्रात मागील पाच वर्षापासून कार्यरत आहे या काळामध्ये संस्थेने हजारो रुग्ण जे पाठ,मान,गुडघे दुखीमुळे आजारी होते.त्यांना विना ऑपरेशन बरे केले आहे .संस्थेचे अध्यक्ष डॉ.शंकर खेडकर मागील २० वर्षापासून योग चिकित्सा करत असून आत्तापर्यंत त्यांनी १९५०० रुग्णांना व्याधीपासून मुक्ती मिळवून दिली आहे अशा प्रकारे चिकित्सा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातून येणा-या रुग्णांची संख्या जास्त आहे.<br>त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका परीसरातील रुग्णाची सोय होण्याच्या दृष्टीने, त्या भागामध्ये चिकित्सा केंद्र सुरु करण्याचा मानस आहे.<br>आद्यम योग संस्था वडगाव शेरी पुणे ४११०१४ या संस्थेस प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८ ,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर, गणेशनगर,संचेती शाळेजवळ,थेरगाव डांगे चौक रोड ,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा म.न.पा.ने योग व योग थेरपीसाठी संस्थेस दिल्यास, योग व योग थेरपीसाठी येणा-या एकूण नागरिकांच्या संखेच्या ७५ % नागरिकांकडून आद्यम योग संस्था, यांनी स्वतः ठरवलेले शुल्क त्यांचेकडून आकारून त्यांना योग व योग थेरपी देणेस व योग थेरपीसाठी येणा-या एकूण नागरिकांच्या संखेच्या २५ % म.न.पा अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्र पाहून विनामुल्य योग व योग थेरपी ही सुविधा देण्यास तयार आहे.<br>तरी वरील अटी नुसार व म.नपा.च्या इतर अटी व शर्तीनुसार,म.न.पा.चे प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर, गणेशनगर,संचेती शाळेजवळ ,थेरगाव डांगे चौक रोड,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा आद्यम योग संस्था,वडगाव शेरी पुणे या संस्थेस,योग व योग थेरपीसाठी ५ वर्षे कराराने चालविण्यास मिळणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी असे कळविले आहे.<br>आद्यम योग संस्था, वडगाव शेरी पुणे यांच्या खालील प्रमाणे संस्था, योग व योग थेरपीसाठी कार्यरत असून त्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद आहे.<br>१) आद्यम योगा पुणे ,विरंगुळा केंद्र कपिल हॉटेलच्या मागे पुणे स्टेशन ,पुणे<br>२) आद्यम योगा वारजे ,आचार्य सोसायटी शानू पटेल शाळेजवळ वारजे पुणे<br>३) आद्यम योगा मारुन्जे,मारुन्जे हॉस्पिटल जवळ राजकमल स्वीट मागे मारुन्जे हिंजवडी पुणे<br>४) आद्यम योगा येरवडा, डीव्हीजनल स्पोर्ट्स अकादमी,ग्यानबा मोझे शाळेजवळ,येरवडा पुणे<br>५) आद्यम योगा अलिगढ एम.५६जनकपुरी रामघाट रोड,अलिगढ उत्तरप्रदेश |

| | |
|---|---|
| | ६) आद्यम योगा मुंबई,यशोधन कंपाऊंड,माटूंगा,दादर मुंबई<br>आद्यम योगा पुणे,विरंगुळा केंद्र कपिल हॉटेलच्या मागे पुणे स्टेशन,पुणे येथे पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक योग थेरपी साठी जात असून त्यांना चांगला अनुभव आलेला आहे .<br>म.न.पा.चा प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८ ,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर, गणेशनगर,संचेती शाळेजवळ,थेरगाव डांगे चौक रोड,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा आद्यम योग संस्था, वडगाव शेरी पुणे या संस्थेस,योग व योग थेरपीसाठी ५ वर्षे कराराने चालविण्यास दिल्यास, म.न.पा.ज्या अधिकारी व कर्मचारी यांना पाठ,मान,गुडघे दुखी,कंबर दुखी असेल अशा अधिकारी व कर्मचारी यांनी ही योग व योग थेरपी ३ महिने घेतल्यास त्याचा नक्की फायदा त्यांना होण्यास मदत होईल.<br>तरी म.न.पा.चा प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर , गणेशनगर,संचेती शाळेजवळ,थेरगाव डांगे चौक रोड,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा,आद्यम योग संस्था वडगाव शेरी पुणे ४११०१४ या संस्थेस योग व योग थेरपीसाठी संस्थेस करारांचे चालविण्यास दिल्यास, योग थेरपीसाठी येणा-या एकूण नागरिकांच्या संख्येच्या ६० % नागरिकांकडून आद्यम योग संस्था, यांनी स्वतः ठरवलेले शुल्क त्यांचेकडून आकारून त्यांना योग थेरपी देणेस व योग थेरपीसाठी येणा-या एकूण नागरिकांच्या संख्येच्या ४० % म.न.पा अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्र पाहून विनामुल्य योग व योग थेरपी ही सुविधा देणेस बंधकारक राहील. या अटीवर व म.न.पा.चे अटी व शर्तीनुसार, आद्यम योग संस्था वडगाव शेरी पुणे ४११०१४ या संस्थेस, प्रभाग क्र.२४,आरक्षण क्र.६२८,सर्व्हे नं.२२/३/२ आनंदवन नगर, गणेशनगर,संचेती शाळेजवळ ,थेरगाव डांगे चौक रोड,मैदान थेरगाव येथील तळ मजल्यावरील हॉल हा योग व योग थेरपीसाठी ५ वर्षे कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२५** **विषय क्रमांक –३२५**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२५<br>दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. जा.क्र.पअक/ ४ /कावि/ ३६२/२०२३ दिनांक २/०५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नद्यांचे पात्र स्वच्छ ठेवण्याचे कामाचे प्रशासकिय / अंदाजपत्रकिय रक्कमेमध्ये वाढ करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२५<br>दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. जा.क्र.पअक/ ४ /कावि/ ३६२/२०२३ दिनांक २/०५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून वाहणा-या पवना, इंद्रायणी व मुळा या नद्यांचे पात्र स्वच्छ ठेवून पाण्याची गुणवत्ता निकषाप्रमाणे ठेवणे |

आवश्यक आहे. नद्यांच्या पात्रातील जलपर्णी झाडेझुडे व इतर तरंगणारे वस्तू वेळोवेळी काढणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत सदरचे काम आरोग्य विभागाद्वारे करणेत येत आहे. पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने सदरचे जलपर्णी काढणेचे काम यांत्रिकी पध्दतीने करणेचे नियोजित असून कामाची मुदत ३ वर्षाकरीता राहणार आहे. कामांचा कालावधी ३ वर्षाच्या असल्यास सदर कामांच्या अंदाजपत्रकिय रक्कमेमध्ये सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकात वाढ करणे आवश्यक आहे. सन २०२३ – २४ चे अंदाजपत्रकात खालिल तक्त्यात नमुद केलेले कामाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेत वाढ खालिलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बजेट कोड | उपलेखाशिर्ष/ कामाचे नाव | लेखाशिर्ष | पा/क्र. – अ.क्र. | अंदाजपत्रकिय रक्कम | सुधारित अंदाजपत्रकिय रक्कम (३ वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २३२४०२८१२ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुळा नदी पात्र स्वच्छ ठेवणे कामी आवश्यक ते कामे करणे. | देखभाल व दुरुस्ती | ३९६/१ | २,००,००,०००/- | ८,००,००,०००/- |
| २ | २३२४०२८१३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इंद्रायणी नदी पात्र स्वच्छ ठेवणे कामी आवश्यक ते कामे करणे. | देखभाल व दुरुस्ती | ३९६/२ | ३,००,००,०००/- | १०,००,००,०००/- |
| ३ | २३२४०२८१४ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पवना नदी पात्र स्वच्छ ठेवणे कामी आवश्यक ते कामे करणे. | देखभाल व दुरुस्ती | ३९६/३ | ३,००,००,०००/- | १०,००,००,०००/- |

वरील प्रमाणे विषयास मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२६** **विषय क्रमांक –३२६**

**दिनांक- २/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२६ दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४९९/२०२३ दि.२/५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहराचे सौंदर्यकरणासाठी सर ज.जी. कला महाविद्यालय मुंबई व सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांचेकडून वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन व व्यवसायिक कामे करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२६ दिनांक-२/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४९९/२०२३ दि.२/५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र सुमारे १८१ चौ. कि.मी. आहे. पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने होत आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या सौंदर्यात भर घालणेच्या दृष्टीने |

| | |
|---|---|
| | शहरात ठिकठिकाणी शिल्प उभारणेत येत आहेत. तसेच भित्तीचित्रे तयार करणेत येत आहेत. व शहरात अजून मोठ्या प्रमाणात सौदर्यकरण करणे आवश्यक आहे.<br><br>महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एडीआर-२०२१/प्र.क्र.८६/तांशि-६ दि. ७ जून २०२२ अन्वये कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील शासकीय कला महाविद्यालयांनी व्यावसायिक कामे स्विकारण्याची कार्यपध्दती निश्चीत केली आहे. सदर कार्यपध्दती सोबत अवलोकनार्थ जोडली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देणे व शहराच्या दृष्टीने उपक्रमांची संकल्पना तयार करणे व त्याचे आराखडे तयार करणे, शिल्प तायर करणे, भितीचित्रे रंगवणे इ. सुशोभिकरणाची कामे सर सर ज.जी. कला महाविद्यालय मुंबई, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांचेकडून करून घेणेबाबत सुचना केलेल्या आहेत.<br><br>राज्य शासनाचा शहर सौंदर्यीकरण व नागरी प्रशासनातील विवध बाबीमध्ये उत्तम कामगिरीबघूनच पुरस्कार प्रदान करणेच्या कार्यक्रमांनंतर म्हणजे दि. २०/४/२०२३ रोजी मा. आयुक्त यांचे सुचनेनुसार सर ज.जी. कला मविद्यालय मुंबई, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयाला भेट दिली व सदरची कार्यपध्दत तेथील मा. प्राचार्य यांचेकडून समजून घेणेत आली.<br><br>सदर सौंदर्यीकरणाचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ च्या मुळ अंदाजपत्रकात सदर कामाचा समावेश नाही. पिंपरी चिंचवड शहराचे सौंदर्यकरणासाठी सर ज.जी. कला महाविद्यालय मुंबई, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांचेकडून वास्तुविशारद, सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन व व्यवसायिक कामे व इत्यादी कामे करणे या कामाचा मुळ अंदाजपत्रकात समावेश करणे व त्यासाठी र.रू. ५.०० कोटी एवढी प्रशासकीय मान्यता व सन २०२३ -२४ साठी र.रू. १ कोटी तरतूद करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**